**TERMS & CONDITIONS OF ONLINE E- AUCTION SALE:-** **1.** The Property is being sold on **"AS IS WHERE IS, WHATEVER THERE & WITHOUT RECOURSE BASIS"**. As such sale is without any kind of warranties & indemnities. **2.** Particulars of the property / assts (viz. extent & measurements specified in the E-Auction Sale Notice has been stated to the best of information of the Secured Creditor and Secured Creditor shall not be answerable for any error, misstatement or omission. Actual extant & dimensions may differ. **3.** E-Auction Sale Notice issued by the Secured Creditor is an invitation to the general public to submit their bids and the same does not constitute and will not be deemed to constitute any commitment or nay representation on the part of the Secured Creditor. Interested bidders are advised to peruse the copies of title deeds with the Secured Creditor and to conduct own independent enquiries /due diligence about the title & present condition of the property / assets and claims / dues affecting the property before submission of bid/s. **4.** Auction/bidding shall only be through "online electronic mode" through the website **https://sarfaesi.auctiontiger.net** Or Auction provided by the service provider **M/s e-Procurement Technologies Pvt. Ltd.**, who shall arrange & coordinate the entire process of auction through the e-auction platform. **5.** The bidders may participate in e-auction for bidding from their place of choice. Internet connectivity shall have to be ensured by bidder himself. Secured Creditor /service provider shall not be held responsible for the internet connectivity, network problems, system crash own, power failure etc. **6.** For details, help, procedure and online bidding on e-auction prospective bidders may contact the Service Provider **M/s e-Procurement Technologies Pvt. Ltd. (Auction Tiger) office Address: B-705, Wall Street II, Opp. Orient Club, Near Gujarat College, Ellis Bridge, Ahmedabad – 380 006, Gujarat (India) support helpdesk - 9265562819 / 9265562821 Support Email – support@auctiontiger.net,ramprasad@auctiontiger.net || support@bankeauctions.com website: https://sarfaesi.auctiontiger.net 7.** For participating in the e-auction sale the intending bidders should register their name at **https://sarfaesi.auctiontiger.net** well in advance and shall get the user id and password. Intending bidders are advised to change only the password immediately upon receiving it from the service provider. **8.** For participating in e-auction, intending bidders have to deposit a refundable EMD of 10% OF RESERVE PRICE (as mentioned above) shall be payable by interested bidders through Demand Draft/NEFT/RTGS in favor of " Hinduja Housing Finance Limited " **on or before 26-NOV-2025. 9.** The intending bidders should submit the duly filled in Bid Form (format available on **https://sarfaesi.auctiontiger.net** ) along with the demand Draft remittance towards EMD in a sealed cover addressed to the **Authorized Officer HHFL Regional Office 1st Floor, DIP Bangla Chowk, Towards Senapati Bapat Road, Pune Maharashtra- 411016 and Branch office At Shop No. 7 & 8 PADMAVISHWA REGENCY, 4 th Floor, Near Old Manawata Cancer Hospital, Behind Saroj Traval, Mumbai Naka NASHIK 422002. latest by 03:00 PM on 26-NOV-2025**. The sealed cover should be super scribed with "Bid for participating in E-Auction Sale - in the Respective Loan Account No and Name of customers for respective property (as mentioned above) **10.** After expiry of the last date of submission of bids with EMD, Authorised Officer shall examine the bids received by him and confirm the details of the qualified bidders (who have quoted their bids over and above the reserve price and paid the specified EMD with the Secured Creditor) to the service provider **M/s e-Procurement Technologies Pvt. Ltd.** to enable them to allow only those bidders to participate in the online inter-se bidding /auction proceedings at the date and time mentioned in E-Auction Sale Notice. **11.** Inter-se bidding among the qualified bidders shall start from the highest bid quoted by the qualified bidders. During the process of inter-se bidding, there will be unlimited extension of "10" minutes each, i.e. the end time of e- auction shall be automatically extended by 10 Minutes each time if bid is made within 10 minutes from the last extension. **12.** Bids once made shall not be cancelled or withdrawn. All bids made from the user id given to bidder will be deemed to have been made by him alone. **13.** Immediately upon closure of E-Auction proceedings, the highest bidder shall confirm the final amount of bid quoted by him BY E-Mail both to the Authorised Officer, **Hinduja Housing Finance Limited, Regional Office 1st Floor, DIP Bangla Chowk, Towards Senapati Bapat Road, Pune Maharashtra- 411016. and Branch office At Shop No. 7 & 8 PADMAVISHWA REGENCY, 4 th Floor, Near Old Manawata Cancer Hospital, Behind Saroj Traval, Mumbai Naka NASHIK 422002 Maharashtra** and the Service Provider for getting declared as successful bidder in the E-Auction Sale proceedings. **14.** The successful bidder shall deposit 25% of the bid amount (including EMD) on the same day of the sale, being knocked down in his favour and balance 75% of bid amount within 15 days from the date of sale by DD/Pay order/NEFT/RTGS/Chq favouring Hinduja Housing Finance Limited. **15.** In case of default in payment of above stipulated amounts by the successful bidder / auction purchaser within the stipulated time, the sale will be cancelled and the amount already paid (including EMD) will be forfeited and the property will be again put to sale. **16.** At the request of the successful bidder, the Authorised Officer in his absolute discretion may grant further time in writing, for depositing the balance of the bid amount. **17.** The Successful Bidder shall pay 1% of Sale price towards TDS (out of Sale proceeds) and submit TDS certificate to the Authorised officer and the deposit the entire amount of sale price (after deduction of 1% towards TDS), adjusting the EMD within 15 working days of the acceptance of the offer by the authorized officer, or within such other extended time as deemed fit by the Authorised Officer, falling which the earnest deposit will be forfeited. **18.** Municipal / Panchayat Taxes, Electricity dues (if any) and any other authorities dues (if any) has to be paid by the successful bidder before issuance of the sale certificate. Bids shall be made taking into consideration of all the statutory dues pertaining to the property. **19.** Sale Certificate will be issued by the Authorised Officer in favour of the successful bidder only upon deposit of entire purchase price / bid amount and furnishing the necessary proof in respect of payment of all taxes / charges. **20.** Applicable legal charges for conveyance, stamp duty, registration charges and other incidental charges shall be borne by the auction purchaser. **21.** The Authorized officer may postpone / cancel the E-Auction Sale proceedings without assigning any reason whatsoever. In case the E-Auction Sale scheduled is postponed to a later date before **15 days** from the scheduled date of sale, it will be displayed on the website of the service provider. **22.** The decision of the Authorised Officer is final, binding and unquestionable. **23.** All bidders who submitted the bids, shall bedeemed to have read and understood the terms and conditions of the E-Auction Sale and be bound by them. **24.** For further details and queries, contact Authorised Officer, Hinduja Housing Finance Limited. P**ANKAJ CHAUDHARI - 7081828333, RUSHIKESH UBHALE-9823244498, DEVIDAS GHOTEKAR- 9158138798. 25.** This publication is also **15 (Fifteen) days**' notice to the Borrower / Mortgagor / Guarantors of the above said loan account pursuant to rule 8(6) of Security Interest (Enforcement) Rules 2002, about holding of auction sale on the above-mentioned date / place.

**Place: Place : Kalyan ( Thane ), Date: 10 - November - 2025**
**Authorized Officer, Hinduja Housing Finance Ltd.**

Special Instructions / Caution: Bidding in the last minutes/seconds should be avoided by the bidders in their own interest. Neither Hinduja Housing Finance Limited nor the Service Provider will be responsible for any lapses/failure (Internet failure, Power failure, etc.) on the part of the bidder in such cases. In order to ward off such contingent situation, bidders are requested to make all the necessary arrangements / alternatives such as back-up power supply and whatever else required so that they are able to circumvent such situation and are able to participate in the auction successfully.



## जव्हारमध्ये भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी

**जव्हार :** जव्हार तालुक्यातील न्याहाळे मांडलामध्ये जनजाती गौरव दिनानिमित्त भगवान बिरसा मुंडा जयंती व क्रांतीवीर राघोजी भांगरे जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मौजे नांगरमोडा-पिंपळगाव येथे या कार्यक्रमाची रंगतदार सुरुवात झाली. या कार्यक्रमात परिसरातील आदिवासी बांधवांनी पारंपरिक पोशाख परिधान करून मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. तारपा, संबळ, सुर सनई, ढोल नाच अशा विविध पारंपरिक वाद्यांच्या गजरात गावभर जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. क्रांतिकारकांच्या पालखी मिरवणुकीने गावातील प्रमुख रस्त्यांवरून उत्साहात फेरी काढण्यात आली.मिरवणुकीचा समारोप दत्त मंदिर सभामंडपात झाला. या ठिकाणी पूज्य स्वामी भारतानंद सरस्वती महाराज आणि श्री. नरेश मराड सर यांनी “आदिवासी क्रांतिकारकांचे देशासाठी योगदान, त्यांचे जीवनचरित्र आणि आदिवासी संस्कृतीचे जतन” या विषयावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले.या प्रसंगी राजेश कोरडा, माजी सभापती सुरेश कोरडा, उपसरपंच नरेश पढेर, ग्रामपंचायत सदस्य रमेश जंगली, रमेश कोरडा, यशवंत ताराल, शैलेश दिघे, विलास दिघा, मोहन भोरे, धाकलू, जयराम कोरडा, शांताराम खुताडे, प्रकाश वागळे आदी मान्यवर उपस्थित होते. परिसरातील असंख्य कार्यकर्ते व आदिवासी बांधवांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्साही प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना १५ नोव्हेंबर २०२५ रोजी जव्हार येथे होणाऱ्या जनजाती गौरव दिनाच्या मुख्य कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

# घनकचरा व्यवस्थापनाच्या निविदेला पुन्हा मुदतवाढ!

## अनामत रक्कम ‘ऑनलाइन’ स्वीकारणार

◆ **विरार (प्रतिनिधी) :**

घनकचरा व्यवस्थापनाच्या कंत्राटासाठी निविदा भरण्याकरिता पालिकेने ठरवून दिलेली अनामत रक्कम 'डिमांड ड्राफ्ट'द्वारे देण्यासाठी कंत्राटदारांना तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे या निविदेला आणखी एकदा मुदतवाढ देण्यात आली आहे. निविदा भरण्यास कंत्राटदारांना कमी वेळ मिळाल्याच्या कारणावरून यापूर्वी सुद्धा एक मुदतवाढ देण्यात आली होती.

वसई - विरार महापालिका क्षेत्रातील दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, वर्गीकृत आणि विलगीकृत कचरा संकलन करणे व संकलित कचरा डम्पिंग ग्राउंडवर वाहतूक करणे या कामाचे कंत्राट आता पाच वर्षांकरिता देण्यात येणार आहेत. त्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. पालिका हद्दीतील ९ प्रभागनिहाय ही निविदा काढण्यात आली आहे.

नव्याने काढण्यात आलेल्या या निविदेत काही अटीतही शिथिलता देण्यात आली आहे. कंत्राटदारांना एकापेक्षा जास्त प्रभागात काम करण्याची संधी सुद्धा देण्यात आली आहे. या प्रक्रियेमुळे पालिकेच्या कोट्यवधी रुपयांची बचत होण्यासोबतच कंत्राटदाराला सुद्धा काम करणे सोपे होणार आहे. दरम्यान, पालिकेने या कामासाठी गेल्यावर्षी पहिल्यांदा निविदा काढली होती.

आतापर्यंत दोन निविदा यापूर्वी वेगवेगळ्या कारणासाठी रद्द करण्यात आल्या आहेत. आता तिसऱ्यांदा निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असून, २६ सप्टेंबर २०२५ ते ४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत निविदा स्वीकारण्यात आल्या आहेत. त्यानंतर निविदाधारकांना निविदा भरण्यास कमी वेळ मिळाल्याच्या कारणावरून ७ नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. मुदतवाढीनंतर ११ नोव्हेंबर रोजी या निविदा उघडण्याची तारीख होती. मात्र निविदेसोबत पालिकेने ठरवून दिलेली अनामत रक्कम डिमांड ड्राफ्टद्वारे भरण्यास कंत्राटदारांना तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे आता पुन्हा एकदा निविदा भरण्यास १४ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.



### प्रभागातील क्षेत्रानुसार अनामत रक्कम

घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी प्रभागनिहाय अनामत रक्कम ठरवून देण्यात आली आहे. अनामत रकमेसोबत २० हजार रुपये निविदा शुक्क आणि १८ टक्के जीएसटी ची रक्कम सुद्धा कंत्राटदारांना निविदेसोबतच द्यावी लागणार आहे. प्रभाग ए मधील कामासाठी ४३ लक्ष रुपये अनामत रक्कम ठेवण्यात आली आहे. प्रभाग बीसाठी ७४ लक्ष रुपये, प्रभाग सी ३८ लक्ष रुपये, प्रभाग डी ५५ लक्ष रुपये, प्रभाग ई ४७ लक्ष रुपये, प्रभाग एफ ५२ लक्ष रुपये, प्रभाग जी ३९ लक्ष रुपये, प्रभाग एच ५० लक्ष रुपये आणि प्रभाग आयसाठी ४० लक्ष रुपये अनामत रक्कम पालिकेकडून ठेवण्यात आली आहे.

### एक वर्षापासून अडथळ्यांची शर्यत

घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी सर्वप्रथम सन २०२४ ते २०२७ दरम्यान तीन वर्षांच्या कालावधीसाठी त्रिवार्षिक निविदा ११ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. या प्रक्रियेत कंत्राटदारांनी दिलेले लघुत्तम दर पालिकेला मान्य नव्हते त्यामुळे कंत्राटदार, तांत्रिक सल्लागार आणि पालिकेची वाटाघाटीसाठी बैठक घेण्यात आली. वाटाघाटीत कंत्राटदाराने दिलेले दर सुद्धा मान्य केल्यास मोठा आर्थिक भार पालिकेवर पडणार असल्याचे कारण देत निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली. त्यानंतर मे २०२५ मध्ये नव्याने दुसऱ्यांदा ई निविदा प्रक्रिया राबवली. मात्र यामध्ये देखील प्रशासकीय अडचणीचे कारण देत पालिकेने ती रद्द करत इतर महापालिकेच्या निविदांचा अभ्यास करून तिसऱ्यांदा निविदा प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार आता तिसऱ्यांदा निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

# वसई-विरारमधील रस्ते गेले ‘खड्ड्यात’!

◆ **विरार (प्रतिनिधी) :**



वसई-विरार शहरातील रस्त्यांचे रूपांतर खड्ड्यांमध्ये झाल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. रस्त्यांवर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे नागरिक, वाहनचालक हैराण झाले असून प्रत्येक पाच ते दहा फूट अंतरावर एक खड्डा अशी अवस्था सध्या रस्त्यांची झाली आहे. या रस्त्यांमुळे अपघाताच्या घटनांमध्ये वाढ झालेली आहे. रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी काढण्यात येणाऱ्या निविदांना कंत्राटदारांकडून प्रतिसाद मिळत नसल्याने रस्ता दुरुस्तीची कामे रखडलेली आहेत.

वसई - विरार शहरांतर्गत असलेल्या रस्त्यावर सर्वाधिक खड्डे पडले आहेत. वसईतील पापडी, माणिकपूर, अंबाडी रोड, गोखिवरे, वसंत नगरी सर्कल, रेंज ऑफिस, वालिव नाका नालासोपारा टाकी रोड, नालासोपारा पूर्व उड्डाणपुलाजवळ, संतोष भुवन, नालासोपारा पश्चिम सोपारा गाव रस्ता, विरार येथील साईनाथ नगर, चंदनसार या भागात रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत.

रस्त्यांवरील या खड्ड्यांमधून वाट काढताना प्रवाशांना झटके बसून प्रवासी आणि रिक्षाचालकांना मानदुखी, कंबरदुखी आणि गुडघादुखीसारखे आजार बळावले आहेत. खड्ड्यांचा ज्येष्ठ नागरिक, महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

### निविदांना प्रतिसाद नाही

रस्ते दुरुस्तीचे काम करण्यास यापूर्वी कंत्राटदारांमध्ये मोठी स्पर्धा लागत होती. मात्र रस्त्यांची कामे पूर्ण केल्यानंतर देयके मिळत नसल्याने कंत्राटदारांनी यावेळी रस्ते दुरुस्तीसाठी निघालेल्या ६८ कोटीच्या कामांना फारसा प्रतिसाद दिला नाही. परिणामी पालिकेला वारंवार मुदतवाढ देऊन निविदा प्रसिद्ध कराव्या लागल्या. आता काही महत्वाच्या रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले.

### नायगाव फाटा-जूचंद्र रस्त्याची झाली चाळण

मुंबई-अहमदाबाद महामार्गाला जोडणाऱ्या नायगाव-जुचंद्र रस्त्याची दुरवस्था झाली आहे. महामार्गावरून वसईत येण्यासाठी नायगाव उड्डाणपूल तयार करण्यात आला. त्यामुळे वाहनचालकांचा पाऊणतास वेळ वाचण्यास मदत झाली. मात्र महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्याची अत्यंत बिकट अवस्था झाली आहे.

# दहिसर टोल नाका स्थलांतरणाला विरोध

## वसईकरांची परिवहन मंत्र्यांच्या समोरच नारेबाजी



◆ **वसई (प्रतिनिधी):**

दहिसर टोल नाका वसई - विरार हद्दीत मुंबई - अहमदाबाद महामार्गावर स्थलांतर करण्याला स्थानिक नागरिकांनी पुन्हा एकदा विरोध दर्शविला आहे. टोलनाका स्थलांतर करण्याला वसई - विरार मधून सुरुवातीपासूनच विरोध करण्यात येत आहे. या कामाच्या पाहण्यासाठी शनिवारी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आले असता स्थानिक नागरिकांनी टोल नाका स्थलांतराला विरोध करीत नारबाजी केली.

दहिसर टोल नाका वसई - विरार हद्दीत मुंबई - अहमदाबाद महामार्गावर स्थलांतर करण्यासाठी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मागणीनुसार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दहिसर टोलनाका स्थलांतर करण्याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश एमएसआरडीसी ला दिले होते. त्यानंतर वसई विरारला स्थलांतर करण्याचा मार्ग समोर आला. मात्र या टोलनाक्याला वसई-विरार करांनी कडाडून विरोध दर्शवला. मीरा भाईंदर करांना मुंबईला जाण्यासाठी दहिसर टोलनाक्यामुळे मोठ्या वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते.

त्यामुळे हा टोलनाका स्थलांतर करण्याची मागणी समोर आली होती. मात्र वसई विरार हद्दीत मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर हा टोलनाका स्थलांतर केल्यास ती वाहतूक कोंडी वसई-विरार हद्दीत महामार्गावर होण्याची शक्यता नाकारता येणारी नाही. आधीच मुंबई अहमदाबाद महामार्गावर जीवघेणी वाहतूक कोंडी होत असते. अशातच टोलनाका आल्यास वाहतूक कोंडीत वाढ होणार असल्याचे सांगत स्थानिकांनी विरोध केला होता.

मात्र नागरिकांच्या विरोधानंतर देखील टोलनाका स्थलांतरित केला जाईल अशी घोषणा परिवहन मंत्री सरनाईक यांनी केली होती. पण जागा निश्चित नसल्यामुळे हा मुद्दा पुन्हा एकदा लांबणीवर गेला. याच पार्श्वभूमीवर शनिवारी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी टोलनाका स्थलांतरित करण्याच्या दृष्टीने वसईच्या हद्दीतील ससूनवघर येथे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसह पाहणी दौरा केला.

मात्र याच पाहणी दौऱ्यावेळी काँग्रेस नेते विजय पाटील, भूमिपुत्र फाउंडेशनचे अध्यक्ष सुशांत पाटील यांच्यासह स्थानिक गावकऱ्यांनी एकत्र जमून सरनाईकांच्या पाहणी दौऱ्याला कडकडून विरोध दर्शविला. तसेच वसईच्या हद्दीत टोल नाका होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका मांडली. तसेच या विरोधात गावकरी मिळून मोठं जनआंदोलन उभारू असा इशारा देखील भूमिपुत्र संघटनेने दिला आहे.

# गटारांवरील धोकादायक झाकणे हटवा

## भाजपच्या महेश सरवणकर यांची मागणी

◆ **वसई (प्रतिनिधी):**

वसई-विरार महापालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ‘एच’मध्ये अनेक ठिकाणी गटारांवरील झाकणे तुटलेल्या अवस्थेत आहेत. या तुटलेल्या झाकणांमुळे रहदारी करणाऱ्या नागरिकांचा अपघात होण्याची दाट शक्यता आहे. माणिकपूर परिसरातील गटारांवरील तसेच फुटपाथवरील तुटलेली झाकणे त्वरित बदली करून नवीन झाकणे लावण्याची मागणी भारतीय जनता पार्टी वसई रोड मंडळ अध्यक्ष महेश सरवणकर यांनी केली आहे.

वसई-विरार महापालिका प्रभाग समिती ‘एच’ कार्यक्षेत्र असलेल्या गटारांवरील तसेच फूटपाथवरील झाकणे मोडकळीस आलेली आहेत. काही ठिकाणी गटारांवरील झाकणेच



गायब आहेत. त्यामुळे सदर ठिकाणी लाकडी प्लायवूड टाकलेले आहेत. प्रभाग समिती ‘एच’ कार्यक्षेत्रातील दत्तात्रय शॉपिंग सेंटरच्या समोरील फुटपाथवर गटाराचे झाकण तुटलेल्या अवस्थेत असून सदर फुटपाथवरून हजारो नागरिक रहदारी करत आहेत. नागरिक, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले सदर ठिकाणाहून ये-जा करत असतात. मात्र या ठिकाणी गटारावरील झाकण नसल्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. वसई-विरार महापालिका गटारावरील तुटलेल्या झाकणामुळे अपघात होण्याची वाट बघत आहे का? असा सवाल महेश सरवणकर यांनी विचारला आहे. महापालिकेच्या बांधकाम विभागातील अभियंत्यांनी प्रभाग समिती ‘एच’ कार्यक्षेत्रातील गटारांवरील झाकणांचा सर्वे करून तुटलेली, मोडकळीस आलेली झाकणे त्वरित बदली करण्याची मागणी महेश सरवणकर यांनी केली आहे.

# वसईत जगद्गुरू नरेंद्रचार्यजींचा पादुका दर्शन सोहळा उत्साहात

◆ **वसई (प्रतिनिधी):**

वसई पश्चिमेकडील नवघर माणिकपूर साईनगर मैदान येथे रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजींचा पादुका दर्शन सोहळा हजारो भक्तांच्या उपस्थितीत पार पडला. सर्वप्रथम माऊलींच्या सिद्ध पादुकांची मिरवणूक काढण्यात आली. कलशधारी, निशानधारी महिला लेझीम पथक भजन पथक त्यात सहभागी झाले होते. या मिरवणुकीत विविध प्रकारचे देखावे सादर करण्यात आले. भजनी मंडळाच्या सुमधुर गायनाने समस्त वातावरण यावेळी भक्तिमय झाले होते. कार्यक्रम ठिकाणी माऊलींच्या सिद्धपादुकांचे औक्षण करण्यात आले .याप्रसंगी नालासोपाराचे आमदार राजन नाईक यांच्या हस्ते १२५ शालेय बॅग, वह्या, पेन, कंपासपेटी आदी शालेय वस्तूंचे व २ संगणकांचे जिल्हा परिषद मराठी शाळा माणिकपूर, बिलाल पाडा व बावखलपाडा या शाळांना विनामूल्य वाटप करण्यात आले. या वेळी वसई-विरार महानगरपालिकेचे माजी महापौर नारायण मानकर, माजी नगरसेवक तसेच भारतीय जनता पक्ष व बहुजन विकास आघाडीचे पदाधिकारी बहुसंख्येने



उपस्थित होते. प्रवचनकार सुरेखा कुलकर्णी यांनी त्यांच्या प्रवचनातून नवविधा भक्तीचे महत्त्व समजावून सांगितले. या सोहळ्यात १५०० भाविकांनी सामूहिक पादुका पूजन केले. ९२ भाविकांनी उपासक दीक्षा घेतली ज्यामध्ये विशेषतः किशोरवयीन मुलांचा यामध्ये मोठ्या संख्येने सहभाग होता. जगद्गुरू श्रींनी या उपासाचे सुंदर मार्गदर्शन केले. जिल्हा तालुका आणि सेवा केंद्र समिती, हिंदू संग्राम सेना, युवा सेना महिला सेना, विशेष कार्यवाहक व गुरू सेवकांसह अनेक पथकांनी या सोहळ्यात उत्तम गुरू सेवा केली.

# गणेश उदावंत यांना आदर्श शिक्षक पुरस्कार!

◆ **जव्हार (वार्ताहर) :**

गगनगिरी आदिवासी शिक्षण प्रसारक संस्था संचलित एकलव्य प्राथमिक माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, जव्हार येथील कर्तव्यदक्ष, अभ्यासू आणि नवनवीन शैक्षणिक दृष्टिकोन ठेवणारे मुख्याध्यापक गणेश श्रीकृष्ण उदावंत यांना महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी उपसभापती स्वर्गीय वसंतरावजी डावखरे यांच्या स्मृतिपित्यर्थ कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार निरंजन डावखरे यांच्या संकल्पनेतून दिला जाणार प्रतिष्ठित “कोकण विभाग वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार – २०२५” या मानाच्या सन्मानाने एम. एच. हायस्कूल, शिवाजी पथ, ठाणे येथे गौरविण्यात आले आहे. हा सन्मान भाजप शिक्षक आघाडी, कोकण विभाग यांच्या वतीने आयोजित भव्य सोहळ्यात समारंभाध्यक्ष निरंजन वसंतराव डावखरे, आमदार कोकण पदवीधर मतदार संघ यांच्या शुभहस्ते उदावंत यांना प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी संजयजी केळकर आमदार, ठाणे शहर मतदारसंघ, डॉ. विजय विनय सहस्त्रबुद्धे अध्यक्ष, राज्य सांस्कृतिक धोरण अंमलबजावणी समिती महाराष्ट्र, तसेच विशेष अतिथी ज्ञानेश्वर म्हात्रे आमदार कोकण विभाग



शिक्षक मतदारसंघ, शिक्षण क्रांती संघटनेचे अध्यक्ष सुधीर घागस आणि इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा अतिशय उत्साहात संपन्न झाला. कोकण विभागातील सात जिल्ह्यांपैकी-पालघर, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग-या एकूण ५० तालुक्यांमधून जव्हार तालुक्यातील उदावंत यांची निवड करण्यात आली. या निवडीद्वारे त्यांच्या शैक्षणिक कार्याचा, सामाजिक बांधिलकीचा आणि शिक्षण क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानाचा गौरव झाला आहे. या सन्मानाबद्दल आपल्या भावना व्यक्त करताना उदावंत म्हणाले “हा सन्मान केवळ माझा नसून माझ्या शाळेचा, सहकाऱ्यांचा, विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा आहे. ही प्रेरणा माझ्या पुढील शैक्षणिक प्रवासाला नवी ऊर्जा देईल. तसेच त्यांनी पुढे नमूद केले.

# कवाडा-वसा-उंबरगाव रस्त्यांची दुर्दशा

## डी. वाय. एफ. आयचा आंदोलनाचा इशारा

◆ **तलासरी (वार्ताहर) :**

तलासरी उंबरगाव रस्त्यावरील वेरोळी नदीवरील झरिखाडी येथील पुलाचे काम अजून पूर्ण न झाल्याने तसेच या मार्गावर नवीन पुलांलागत उन्हाळ्यात पाईप टाकून बनविण्यात आलेला रस्ता ही वाहून गेल्याने या मार्गावरील वाहतूक कवाडा वसा मार्गे उंबरगाव तसेच नारायणठाणा संजाण मार्गे उंबरगाव असा वळविण्यात आली आहे.

झरी खाडी येथील नवीन बांधण्यात येत असलेल्या पुलाच्या काम अत्यंत धीम्या गतीने सुरू आहे. तसेच या कामामुळे वाहतूक वळविलेले पर्यायी मार्गाचे रस्ते हे अरुंद आहेत. तसेच या अंतर्गत रस्ते वाहतूक वाढल्याने या रस्त्याची दुर्दशा झाली असून रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून काही ठिकाणी रस्त्याला भगदाड ही पडले आहेत. यामुळे या मार्गावर अपघाताचे प्रमाण



वाढले असून या अपघातात अनेक गंभीर जखमी ही होत आहेत.

तलासरी भागातून मोठ्याप्रमाणात कामगार वर्ग हा उंबरगाव येथील कारखान्यात कामाला जातो, तसेच शाळा कॉलेजला विद्यार्थीही जातात, पण अरुंद तसेच खड्डेमय रस्त्यामुळे कामागारांना कारखान्यात तर विद्यार्थ्यांना शाळेत जायला उशिर होतो.

परंतु सार्वजनिक बांधकाम खाते या पर्यायी रस्त्याची दुरुस्ती करीत नसल्याने कामगारांना तसेच विद्यार्थ्यांना, मोठा त्रास सहन करावा लागतो. सद्या पाऊस उघडला असल्याने नदीचेही पाणी कमी झाले असल्याने पुलालगत पाईप टाकून बनविलेला रस्ता दुरुस्त केल्यास वाहतूक या मार्गावरून सुरू करता येईल. पण तलासरी सार्वजनीक बांधकाम खाते याकडे दुर्लक्ष करीत असल्याने डी वाय एफ आय संघटने मार्फत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. येत्या बारा दिवसात या मार्गावरील वाहतूक सुरळीत न केल्यास आंदोलन करण्यात येणार असल्याचे पत्र डी वाय एफ आय चे राज्य अध्यक्ष नंदकुमार हडळ यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग तलासरीचे उप विभागीय अभियंता यांना दिले आहे.

# कातकरी मजुरावर कामासाठी जबरदस्तीचा प्रयत्न 'श्रमजीवी'ने रोखला

◆ **वाडा (वार्ताहर) :**

कातकरी समाजातील महिला मजुरावर जबरदस्ती करून विटभट्टीवर नेण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी वाडा पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध श्रमजीवी संघटनेच्या मदतीने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकाराने तालुक्यात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाडा तालुक्यातील गौरापूर हद्दीतील कातकरी समाजातील मजूर महिला असून त्या आपल्या पती व दोन मुलांसह कुटुंबासह विटभट्टीवर काम करून उदरनिर्वाह करतात. काही महिन्यांपूर्वी त्यांनी सुदर्शन भोईर याच्याकडून विटभट्टीवरील कामासाठी एकूण २८ हजार रुपये “आगाऊ रक्कम” म्हणून घेतली होती.

त्यानंतर दि. ८ नोव्हेंबर रोजी विटभट्टी मालक सुदर्शन भोईर, त्याची पत्नी व मुलगा तसेच फिर्यादीची नणंद शांता हरळ हे गौरापुर येथे आले. त्यांनी विटभट्टी मालकाकडून 'आगाऊ पैसे घेतल्यामुळे आता कामावर यावेच लागेल' असे सांगत फिर्यादीला हाताला धरून जबरदस्तीने घराबाहेर ओढून काढण्याचा प्रयत्न केला गेला. फिर्यादीच्या मुलाची तब्येत ठीक नसल्याने महिलेने नकार दिला. त्यानंतर विटभट्टी मालक सुदर्शन भोईरच्या पत्नीने फिर्यादी महिलेचा हात पकडून जातीवाचक शिवीगाळ करून अपमान करून घराच्या बाहेर काढून कामावर नेण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान झालेल्या आरडाओरडामुळे गावातील श्रमजीवी संघटनेचे वाडा तालुका सचिव सुरज दळवी आणि कार्यकर्ता नामदेव पवार यांनी हस्तक्षेप करून महिलेची सुटका केली. कार्यकर्त्यांच्या मदतीने पिडीत महिलेने पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवली आहे. याबाबत वाडा पोलीस ठाण्यात विटभट्टी मालक सुदेश भोईर, पत्नी आणि मुलगा यांच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला.

# मोखाड्यात थंडीची चाहूल; जागोजागी पेटल्या शेकोट्या

## स्वेटर कानटोपी घालून बोचऱ्या थंडीपासून बचाव सुरू

◆ **मोखाडा (वार्ताहर) :**

मोखाडा व परिसरात थंडीची चाहूल लागल्याने हळूहळू गारठा वाढायला लागला आहे. त्यामुळे ग्रामीण भागात बोचऱ्या थंडीपासून बचाव करण्यासाठी सकाळी जागोजागी शेकोट्या पेटल्याचे चित्र दिसत आहे. सध्या तालुक्यात थंडी पडायला सुरुवात झाली असून वातावरणात चांगलाच गारवा निर्माण झाला आहे. तर थंडीचे प्रमाण आता जरी कमी असले तरी काही दिवसांत थंडी अधिक वाढण्याची शक्यता आहे. यामुळे या थंडीवर उपाय म्हणून ग्रामीण भागातील नागरिक शेकोटीचा आधार घेत असून बालगोपाळांना अडगळीत पडलेला स्वेटर कानटोपी घालून त्यांचा बचाव बोचऱ्या थंडी पासून केला जात आहे.

रात्रीच्या व पहाटेच्या वेळी सुखद गारवा निर्माण होत असून दिवसेंदिवस थंडीचा जोर वाढत चालला आहे. यामुळे या बोचऱ्या थंडी पासून



बचाव करण्यासाठी बाजारपेठेत गरम कपड्यांची मागणी वाढली आहे. काहीनी अडगळीत ठेवलेले स्वेटर, कानटोपी आणि मफलर आदी उबदार कपडे वापरासाठी काढून या उबदार कपड्यांच्या साहाय्याने थंडीचा सामना करत आहेत. तर दिवसेंदिवस थंडीचा जोर वाढत असल्यामुळे ग्रामीण भागात ब्लँकेट, सोलापुरी चादरी, रजई व शॉल यांसारख्या उबदार साहित्य विक्रीचा जोर वाढला आहे. थंडीमुळे ग्रामीण भागातील नागरिक सकाळी लवकर उठून शेकोट्या पेटवून थंडीपासून आपले संरक्षण करतांना ठिकठिकाणी दिसत आहेत. तसेच रात्री उशिरा झोपेपर्यंत ही शेकोटीचा आधार घेत आहेत.तर बदलत्या वातावरणामुळे आरोग्याच्या तक्रारींमध्ये वाढ होतांना दिसत असून सर्दी, ताप, खोकला हे आजार तोंड वर काढण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### थंडीचा परिणाम

गेल्या काही दिवसांपासून गारव्याचे प्रमाण वाढत असल्याने थंडीमध्ये अनेक नागरिक गरम कपडे परिधान करून घराबाहेर पडत आहेत. तर पहाटे लवकर उठून कामधंद्यावर जाणारे नागरिक ही थंडीमुळे उशिरा कामधंद्यावर जात आहेत.


सिडको
शहरांचे शिल्पकार

**बोली मागविणारी सूचना**

**सिडको भवन ७ व्या मजल्यावरील ऑडीटोरीयम हॉलमधील जूना/ कार्यरत नसलेला डक्टेबल एसी युनिट्स बदलणे.**

महाराष्ट्राची सिडको लिमिटेड ई-निविदाकरण प्रक्रीयेद्वारे ‘ऑन लाईन’ दर शतमान निविदा अनिवार्य पात्रता निकषांची पूर्तता करणाऱ्या, सिडको लि. च्या वर्ग ‘ए’ मध्ये नोंदणीकृत असलेल्या किंवा केंद्र सरकार किंवा महाराष्ट्र राज्य सरकार किंवा त्यांच्या उपक्रमांमध्ये योग्य वर्गामध्ये नोंदणीकृत असलेल्या परवाना धारक विद्युत कंत्राटदारांकडून ज्यांनी खाली नमूद कामासाठी तस्तम स्वरूपाचे काम पूर्ण केले आहे त्यांच्याकडून मागवित आहेतः

**१. कामाचे नाव : सिडको भवन ७ व्या मजल्यावरील ऑडीटोरीयम हॉलमधील जूना/ कार्यरत नसलेला डक्टेबल एसी युनिटस बदलणे. २. सी. ए. क्र. :** २३/सिडको/ईई(ईलेक्ट-नोडल)/२०२५-२६ **३. अंदाजे मूल्य :** रु. ४१,२३,४३६.००(जीएसटी वगळून) **४. इ.र.ठे. :** रु. ४१,३००.०० **५. नोंदणीकरण वर्ग :** ‘ए’ **६. पूर्तता कालावधीः** ९० (नव्वद) दिवस (पावसाळ्यासह) **७. निविदा प्रक्रिया शुल्क :** रु. ११८०/- (रुपये एक हजार एकशे ऐंशी मात्र) (१८% जीएसटी सह) (ना-परतावा) बोलीकरण कार्यक्रमासह बोली कागदपत्रे ११/११/२०२५ रोजी १७.०१ वा. पासून **https://maha-tenders.gov.in** संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

**अधीक्षक अभियंता (ईले-एनएम)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३३०/२०२५-२६



**अधिसूचना**

**थेट मुलाखत**

**चर्चगेट, महालक्ष्मी आणि बोरीवली येथे आरोग्य युनिटमध्ये करार आधारावर मेडिकल प्रॅक्टिशनर्सची नियुक्ती करणे**

**मुख्य वैद्यकीय अधिक्षक, मुंबई विभाग,** पश्चिम रेल्वे हे एक वर्षाच्या कालावधीसाठी पुर्ण वेळ करार आधारावर कॉन्ट्रॅक्ट मेडिकल प्रॅक्टिशनर्सच्या पदाची भरती करण्यासाठी मुख्य वैद्यकीय अधिक्षक यांचे कार्यालय, मुंबई सेंट्रल येथे **दि. २७.११.२०२५ रोजी १०:३० वा. थेट मुलाखत** आयोजित करतील. **उमेदवार तपशीलाकरीता आमच्या अधिकृत संकेतस्थळाचा संदर्भ घेऊ शकतात : https://wr.indianrailways.gov.in**

पश्चिम रेल्वे
wr.indianrailways.gov.in

076

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly



**SITA ENTERPRISES LIMITED**

Regd. Office: 415-416, Arun Chambers, Tardeo Road, Mumbai-400 034
CIN No.: L45202MH1982PLC026737 Website: www.sitaenterprises.com

**Standalone Unaudited Financial Results for the Quarter Ended 30.9.2025**

(Rs. in Lakhs)

| Particulars | Quarter ended 30.9.2025 | Quarter ended 30.9.2024 | Year ended 31.3.2025 |
|---|---|---|---|
| Total Income from Operations | 263.13 | 31.49 | 150.43 |
| Net Profit/(Loss) for the period before tax | 257.74 | 24.86 | 124.12 |
| Net Profit/(Loss) for the period after tax | 217.74 | 19.86 | 112.41 |
| Total Comprehensive income for the period [Comprising Profit(Loss) and Other comprehensive income for the period] | 217.74 | 19.86 | 112.41 |
| Equity Share Capital | 300.00 | 300.00 | 300.00 |
| Other Equity (excluding Revaluation Reserve) | - | - | 1248.25 |
| Earnings Per Share (Shares of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) - Basic / Diluted: | 7.26 | 0.66 | 3.75 |

Note : The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI ( Listing and other Disclosure Requirements) Regulations, 2015. Exceptional / Extra ordinary Items - Nil. Other Comprehensive Income - Nil.

The full format of the Results are available on the Stock Exchange website (www.bseindia.com) and the Company's website (www.sitaenterprises.com) and can be accessed by scanning the QR Code.

For and on behalf of the Board of Directors
Harsh Gandhi
Executive Director

Place : Mumbai, Date : 07/11/2025